INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY – 2017

भारतीय सुरक्षेत अंदमान व निकोबार द्विपसमुहाचे लष्करी व सामरिकी दृष्टीकोनातून महत्व

प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख ,संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग,
कै.म.दि. सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय,
नरडाणा ता. शिंदखेडा जि. धुळे.



प्रस्तावना

या बेटांना व्यापारी नग्न लोकांचा देश म्हणून ओळखतात. नंतर ब्रिटीशांनी या बेटांवर आपले अस्तित्व प्राप्त केले. ब्रिटीशांच्या काळात अनेक बंगाली लोक या बेटावर वास्तव्यास आले होते.

श्रीलंकेतून पिटाळून लावण्यात आल्यानंतर भूमिगत झालेले लिट्टेचे नेते आता पुन्हा आपले डोके वर काढू लागले आहेत. ते आता भारताच्या अंदमान-निकोबार बेटांना आपला सुरक्षित अड्डा बनविण्याच्या प्रयत्नात आहे. गृह मंत्रालयाच्या मते, अंदमान व निकोबार हे बेट श्रीलंका, बांगलादेश व म्यानमार या देशांमधून येणाऱ्या लोकांसाठी एक प्रकारचे आश्रयस्थानच आहे.

भौगोलिकदृष्ट्या बंगालच्या उपसागारात हुगळी नदीच्या मुखापासून ५६० नाविक मैल अंतरावर अंदमान हे बेट आढळते. अंदमान बेटसमुहात २०४ लहान मोठी बेटे आहेत. या सर्व बेटांचे क्षेत्रफळ ६६८ चौ.कि.मी. आहे.

अंदमान व निकोबार या भारतीय केंद्रशासीत प्रदेशाचाच निकोबार बेटे एक विभाग आहे. ही बेटे बंगालच्या उपसागरात आग्नेयकडील कोपऱ्यात आहे. या द्विसमुहात एकूण ५७२ बेटे आहेत. येथील ३४ बेटांवर मनुष्यवस्ती आहे. त्यातील काही निर्जन असून माणसे राहत नाहीत.

अंदमान-निकोबार बेटाची रुंदी ८५ कि.मी. असून, लांबी ८०० कि.मी. आहे. येथील लोकसंख्या ४ लाखांच्या जवळपास आहे. अंदमानची राजधानी पोर्टब्लेअर आहे. भारताच्या स्वातंत्र्यआंदोलनात शिक्षा झालेल्या क्रांतीकारकांना शिक्षेसाठी या ठिकाणी पाठविले जाई.

निकोबार बेटातील सर्वात महत्त्वाचे व सधन लोकवस्तीचे बेट म्ळणजे कार होय. येथील ५० मैलांची जमीन सुपीक आहे. येथे मासेमारी, तेल गाळणे, शेती व गुरेपालन हे प्रमुख व्यवसाय आहेत. त्यापैकी शेती, मासेमारी व जंगल उत्पन्नावर निकोबार निवासी आपला जीवनचरीतार्थ चालवितात.

ईशान्य भारतातील बंडखोरांना परकिय सत्ता याच भागातून शस्त्रास्त्रे पुरवितात. दक्षिण आशियातील तस्करी याच मार्गाने होते. भारताच्या पूर्व किनारपट्टीलगत व अंदमान सागरात मोठ्या प्रमाणात खनिज तेलाचे साठे सापडलेले आहेत. यादृष्टीने या भागाचे भूसामरिकी महत्व वाढलेले आहे.

बेटसमुहाच्या भोवती २०० नॉटिकल माईल्सचा जो समुह असतो. त्याला एक्स्ल्यूसिव्ह इकॉनॉमिक झोन (Exclusive Economic Zone) EEZ म्हणतात. म्हणजे ह्या समुद्रावर आपला ताबा असतो. त्यामूळे त्यातून मिळणारे तेल,गॅस आणि इतर खनिज धातू हे आपले असतात. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या या बेटांचे महत्व हे जास्त प्रमाणात आहे.

देशाबाहेर जाऊन सुरक्षेची लढाई आवश्यक :

अरुणाचल प्रदेशात चीनच्या सरहद्दीला समांतर १८०० कि.मी. हा महामार्ग बांधण्याच्या भारतीय योजनेस चीनने २०१४ मध्ये आक्षेप घेतला आहे. नजीकच्या काळात चीनरुपी ड्रॅगन भारताच्या भोवती टेहळणी केंद्राची आणि सैनिकी तळांची एक माळ तयार करुन भारताला वेढण्याचा प्रयत्न करीत आहे. या बंदरामध्ये पाकिस्तानचे ग्वादाद बंदर, श्रीलंकेतील हंवनतोता बंदर, बांगलादेशातील चितगांव बंदर व म्यानमारमधील सितवे बंदर या सर्व बंदराचा समावेश आहे. या सर्व ठिकाणांवरुन चीन भारतावर उत्तम पध्दतीने लक्ष ठेवू शकतो. ह्या गोष्टी लक्षात घेऊन आपली सुरक्षा सांभाळण्यासाठी वेळप्रसंगी देशाबाहेर जाऊन लढणे आवश्यक झाले आहे. म्हणून तर या अंदमान-निकोबार द्विपसमूहाचे अतिशय महत्वाचे स्थान लक्षात घेता स्वातंत्र्य वीर सावरकरांनी असे म्हटले होते की, भारताची सुरक्षितता अभेद्द राखायची असेल तर अंदमान-निकोबार ही द्विपसमूह अभेद्द अशा किल्ल्याची किंवा चौकीची भूमिका निभावू शकतात.

अंदमान-निकोबार वरुन चौफर निगराणी :

ही बेटे भारतापासून जवळजवळ १२०० किलोमीटर अंतरावर आहेत. परंतु ह्या बेटांचे अंतर इंडोनेशिया, थायलंड व म्यानमार या देशांपासून फक्त १५० किलोमीटर अंतरावर आहेत. त्यामूळे या बेटांचे लष्करीदृष्टीकोनातून महत्व अधिक आहे. ही बेटे दक्षिणपूर्व आशिया, चीन, जपान व इतर पूर्वेकडील देश यांचे जे समूद्रीमार्ग आहेत त्यावर वसलेले आहेत. यामूळे चीन व इतर देशांचा व्यापार या समुद्रमार्गाने होत असतो व हा व्यापार युध्दकाळात किंवा युध्दजन्यपरिस्थितीमध्ये थोपवायचा असल्यास या बेटांवर आपले सैन्य किंवा नौदल उभारुन त्यांच्या मदतीने तो व्यापार अतिशय परिणामकारकरित्या आपण थांबवू शकतो. युध्दजन्यपरिस्थितीत किंवा लढाईच्या वेळी चीनवर आर्थिक संकट आणायचे असेल तर या योजनेचा फायदा आपणास होवू शकतो. म्हणून तर या बेटांना सामरीकी तज्ज्ञ "न बुडणारे समुदी विमानवाहू जहाज" असे म्हणतात. कारण येथूनच आपले हवाईदल, नौदल व सैन्यदल आजूबाजूच्या परिसरावर अतिशय चांगल्याप्रकारे लक्ष ठेवू शकते. आपल्याकडे ज्या दोन विमानवाहू युध्दनौका अनुक्रमे आय.एन.एस.विराट व आय.एन्.एस. विक्रमादित्य आहेत त्याचप्रमाणे तिसरी न बुडणारी विमानवाहू नौका म्हणजे 'अंदमान निकोबार बेट' असे म्हणता येईल. कारण येथून आपले हवाईदल आणि नौदल आजूबाजूच्या परिसरावर बारीक लक्ष ठेवू शकते. आपले नौदल द्विपसमूहांमध्ये निरनिराळ्या महत्वाच्या ठिकाणी लष्करी तळ तयार करुन शत्रूवर हल्ले करु शकते. खरे पाहता अंदमान-निकोबार या बेटांचे लष्करी,सामरिकी व व्यापारी दृष्टीकोनातून एवढे महत्व असून आपण त्यांचा पूरेपूर वापर करीत नाही.

अंदमान निकोबारचे सामरिकी महत्व :

अंदमान निकोबारचा इतिहास अभ्यासला असता, १७ व्या शतकातील मराठ्यांच्या काळात मराठ्यांचे सरनौबत कान्होजी आंग्रे यांनीसुध्दा अंदमान-निकोबार या बेटसमूहाचा आपल्यासाठी तात्पुरत्या चौक्या म्हणून उपयोग केला होता. यावरुन आपल्या असे लक्षात येते की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या १७ व्या शतकांमध्ये द्विपसमुहाचे महत्व कळालेले होते. दुसऱ्या महायुध्दात जपानने या द्विपसमुह ताब्यात घेवून तेथे २ वर्षे त्यांचे राज्य होते. आजसुध्दा येथे जपानने बनविलेले बंकर्स दिसून येतात. नंतर हे बेटे ब्रिटीशांनी ताब्यात घेतली. ही बेटे १९५० साली भारताचा हा भाग झाला. परंतु त्यानंतर त्यांचे सामरिक किंवा संरक्षणदृष्ट्या जे महत्व आहे. त्याकडे पूरेसे लक्ष दिले गेले नाही. या स्थळाचा पर्यटनस्थळ म्हणून आपण फायदा उठविलेला नाही. याशिवाय हाँगकाँग, शिंगापूर येथे ज्याप्रमाणे मुक्त व्यापारासाठी एक झोन बनविलेला आहे, जेथून सगळ्या देशांची विमाने व जहाजे प्रवास करतात, तशाच प्रकारचे एक मुक्त बंदर आपण येथू बनवू शकतो. त्यामुळे या रस्त्यावरुन जी हजारो जहाजे रोज प्रवास करतात जी युरोपाकडून साऊथ ईस्ट एशिया, चीन व जपानकडे जात असतात, ती या मुक्त बंदराचा वापर करु शकतील. त्यामूळे आपल्या देशाला प्रचंड आर्थीक लाभ होईल.

द्विपसमूह एक संयुक्त कमांड :

हे द्विपसमुह भारतासाठी अशी एकमेव ठिकाण आहे की, ज्या ठिकाणी भूदल, वायूदल आणि नौदल तिघांचे एक संयुक्तीक कमांड आहे तिथे भूदलाचे सहा हजारांहून अधिक सैन्य आहे. शिवाय नौदलाचा मोठा तळ येथे आहे. यांचा उपयोग आपण सामरिकी दृष्टीकोनातून करु शकतो. कारण सर्व रस्ते या द्विपसमूहातूनच जातात. चिनी नौदलाला तेथून बंगालच्या उपसागारातच अडवता येवू शकते. स्वत:ला सुरक्षित ठेवण्यासाठी अमेरिकेने अफगाणिस्तानात लढाई केली. त्याप्रमाणे आपण चीनच्या नौदलाला बंगालच्या उपसागरामध्येच अंदमान-निकोबारच्या आसपास अडवून आपल्या देशाला सुरक्षित ठेवू शकतो.

द्विपसमूहाचे सुरक्षितेच्या दृष्टीने महत्व

दक्षिण पूर्व आशियातील इतर देश येथून फारच जवळ असल्यामूळे व्यापारासाठी त्याचा चांगला वापर होतो. तेथील ९०% बेटांवर कोणीही राहत नाही. त्यामूळे या भागात समुद्री चाचे मोठ्या प्रमाणात येतात. तसेच अनेक देश आपल्या समुद्रात येऊन मासे पकडण्याचा प्रयत्न करतात. येथून मोठ्य प्रमाणात शस्त्रास्त्रे, दारुगोळा, स्फोटक पदार्थ, अफू, चरस, गांजा यांचे स्मगलिंग होते. ईशान्य भारतातील बंडखोरांना परकिय सत्ता याच भागातून शस्त्रास्त्रे पुरवितात. आपण आपल्या समूद्राला सुरक्षित ठेवण्यासाठी कमी पडत आहोत.

- येथे् बांगलादेशी घुसखोर पोहचले असतील तर त्यांना शोधून काढून पकडणे देखील महत्वाचे आहे.
- इतर राष्ट्रांना मासे पकडणे, गॅस, तेल शोधणे या गोष्टींसाठी भारताने परवानगी देवू नये.
- पर्यटनासाठी हा प्रदेश विकसीत केला पाहिजे.

- इतर देशांची हजारो जहाजे येथून जातात तेव्हा रात्रीच्या वेळी डॉकींगची व्यवस्था करणे.
- बंदरांना विकसत व आधुनिक बनविले पाहिजे.

या बंदरांचा उपयोग संरक्षणाबरोबर, आर्थीक कारणासाठी करणे. सध्या आपले विमानतळ पोर्टब्लेअर, कार निकोबार , कॅम्ब बे येथे आहेत. त्यांचे स्थान सामरिकीदृष्टीकोनातून महत्वपूर्ण आहे. त्यांना अधिक मोठे व आधुनिक बनविले पाहिजे.

अमेरिका, जपान आणि आग्नेय भागातील इतर देश चीनच्या विरोधात मित्रपक्षांची एक फळी तयार करत आहे. त्यांच्या नौदलासाठी आपली बेटे व तेथील सुविधांचा वापर करता येईल. यामूळे चीनविरुद्ध लढण्यास आपण अधिक सक्षम होवू शकतो. तेथील रस्ते, बंदरे, डॉकयार्ड, विमानतळ अधिक सक्षम बनवून भारताच्या दृष्टीकोनातून भक्कम संरक्षण केंद्र उभारता येऊ शकते.

भविष्यात निर्माण होणाऱ्या हिंदी महासागरातील संभाव्य धोक्यांपासून संरक्षणासाठी भक्कम नावीक दलाची योजना राबविली पाहिजे. हिंदी महासागरात या बेट समूहाचे स्थान राजकियदृष्ट्या व सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे आहे. नावीक दलाबरोबरच या भागाच्या आर्थीक विकासासाठी भारताने मूख्य भूमिशी दळणवळणाच्या सोई वाढवल्या पाहिजे.

निष्कर्ष : (Conclusion)

कारगीलप्रमाणे येथेही निर्जन बेटांवर बेकायदा समूद्री आक्रमण केव्हाही होवू शकते. म्हणून भारत सरकारने येथे मजबूत संरक्षण फळी तयार करणे महत्वाचे आहे.

संदर्भ (References):

१) चौधरी अे.पी., चौधरी अर्चना, राष्ट्रीय सुरक्षा ", निराली प्रकाशन, पुणे -१९९९.
२) रायपूरकर वसंत, "आंतरराष्ट्रीय संबंध", मंगेश प्रकाशन, नागपूर २००१
३) मांढरे डी.अे., पाटील पी. आर., तोडकर बी.डी.,"भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध व राष्ट्रीय सुरक्षा ", प्रतिभा पब्लीकेशन्स, पुणे- २००५.
४) प्रा. चौधरी अे.पी., "युध्दविज्ञान (संरक्षण व सामरिकशास्त्र)" डायमंड पब्लिकेशन्स, पुणे- २००८.
५) धर्माधिकारी अ.भ., "चाणाक्य मंडळ", पुणे.